सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
# शासकीय विधी महाविद्यालय
# मुंबई,चर्चगेट ,'ए' रोड ४०००२०.

दूरध्वनी क्र ०२२-२२०४१७०७
Website - www.glcmumbai.com Email - principal@glcmumbai.com

**शाविम/परीक्षा/२०२६-२७/6825** **दिनांक-१७/०८/२०२६**

## विद्यार्थ्यांसाठी सूचना

### परीक्षा कक्षात ३० मिनिटे अगोदर उपस्थित राहण्याबाबत

सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, विद्यापीठाच्या निर्देशानुसार आगामी परीक्षेसाठी प्रत्येक विद्यार्थ्याने **परीक्षेच्या निर्धारित वेळेच्या किमान ३० मिनिटे अगोदर परीक्षा कक्षात (Exam Hall) उपस्थित राहणे अनिवार्य आहे.**

परीक्षा कक्षात प्रवेश करण्यापूर्वी **ओळखपत्र तपासणी, आवश्यक पडताळणी व इतर परीक्षा प्रक्रियेसाठी आवश्यक वेळ** लागणार असल्याने सर्व विद्यार्थ्यांनी वेळेचे काटेकोरपणे पालन करावे.

**विद्यार्थ्यांनी विशेषतः लक्षात ठेवावे :**

- परीक्षेच्या वेळेच्या **किमान ३० मिनिटे अगोदर परीक्षा कक्षात उपस्थित राहावे.**
- परीक्षा कक्षात प्रवेश करताना **वैध ओळखपत्र/आवश्यक कागदपत्रे** सोबत ठेवावीत.
- परीक्षा केंद्रावरील अधिकारी व कर्मचारी यांच्या सूचनांचे पालन करावे.
- विलंब टाळण्यासाठी विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रावर वेळेपूर्वी पोहोचण्याची व्यवस्था करावी.
- परीक्षा प्रक्रियेसाठी आवश्यक सहकार्य करावे.

**उदाहरण :** परीक्षा सकाळी **१०:३० वाजता** सुरू होत असल्यास विद्यार्थ्यांनी **सकाळी १०:०० वाजेपर्यंत** परीक्षा कक्षात उपस्थित राहणे आवश्यक आहे.

**सर्व विद्यार्थ्यांनी वरील सूचनेची गांभीर्याने नोंद घ्यावी.**

A Vaidya 17/08/26

डॉ.अस्मिता वैद्य
प्राचार्य

प्राचार्य
शासकीय विधी महाविद्यालय
'अे' मार्ग, चर्चगेट, मुंबई-२०.

सोबत:- विद्यापीठाचे परिपत्रक

# मुंबई विद्यापीठ

संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
छत्रपती शिवाजी महाराज भवन,
विद्यानगरी परिसर,
सांताक्रूझ (पूर्व) मुंबई - ४०००९८.
Email - dboee@exam.mu.ac.in

**No. EXAM/Circular/Aug/2026/६२६७३** **दिनांक : १७ ऑगस्ट, २०२६**

## परिपत्रक

**विषय : परीक्षार्थींनी परीक्षा कक्ष (Exam Hall ) ३० मिनिटे अगोदर उपस्थित राहण्याबाबत.**

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्न, संचलित व स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक/प्रमुख तसेच रत्नागिरी, ठाणे व कल्याण उपपरिसरांचे समन्वयक/संचालक यांना कळविण्यात येते की, **परीक्षा व मूल्यमापन मंडळ, व्यवस्थापन परिषद तसेच विद्वत परिषदेच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार, शैक्षणिक वर्ष २०२६–२७ पासून व त्यानंतर आयोजित करण्यात येणाऱ्या सर्व परीक्षांसाठी परीक्षार्थींनी परीक्षेच्या निर्धारित वेळेपूर्वी किमान ३० मिनिटे अगोदर परीक्षा कक्ष (Exam Hall ) उपस्थित राहणे अनिवार्य राहील.**

परीक्षा कक्षात (Exam Hall ) प्रवेश करण्यापूर्वी परीक्षार्थींची ओळखपत्र तपासणी, आसनव्यवस्था, आवश्यक पडताळणी तसेच इतर परीक्षा प्रक्रियेसाठी आवश्यक वेळ लागतो. त्यामुळे परीक्षार्थींनी शेवटच्या क्षणी परीक्षा कक्षात (Exam Hall ) उपस्थित न राहता निर्धारित परीक्षा वेळेच्या **किमान ३० मिनिटे अगोदर** परीक्षा कक्षात (Exam Hall ) उपस्थित राहावे.

**उदा. : परीक्षेची वेळ सकाळी १०.३० वाजता असल्यास, परीक्षार्थींनी सकाळी १०.०० वाजेपर्यंत परीक्षा कक्षात (Exam Hall ) उपस्थित राहणे आवश्यक आहे.**

तरी, सर्व संबंधित प्राचार्य, संचालक/प्रमुख व विभागप्रमुख यांनी सदर सूचना त्यांच्या महाविद्यालयातील/संस्थेतील सर्व परीक्षार्थी तसेच संबंधित शिक्षक व परीक्षा कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून देऊन, सदर सूचनेची तात्काळ प्रभावाने काटेकोर अंमलबजावणी करावी.
परीक्षार्थींनी विद्यापीठाच्या परीक्षा नियमांचे व सूचनांचे पालन करून परीक्षा कक्षात (Exam Hall ) अधिकारी व कर्मचारी यांना परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सहकार्य करावे.

Yoonaundale

**(डॉ. पुजा रौंदळे)**
**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**प्रत :**

1. विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्न, संचलित व स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक/प्रमुख तसेच रत्नागिरी, ठाणे व कल्याण उपपरिसरांचे समन्वयक/संचालक.

**प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी :**

1. सर्व उपकुलसचिव, (परीक्षा व मूल्यमापन मंडळ) मुंबई विद्यापीठ.
2. संचालक, ( **DICT) -** सदर परिपत्रक विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याबाबत.
3. उपकुलसचिव, (जनसंपर्क विभाग ), मुंबई विद्यापीठ,
4. मा कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक
5. मा. प्र-कुलगुरू यांचे स्वीय सहाय्यक.
6. मा. कुलगुरू यांचे स्वीय सहाय्यक.